# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


### आगमन, विसर्जन मार्गात वाहतूक नियमांचे पालन करा

मुंबई : श्रींचे आगमन व विसर्जन मिरवणुकीत वाहतूक नियमांचे पालन करावे. स्वयंसेवकांच्या माध्यमातून गर्दीचे योग्य नियोजन करावे आणि आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवावे. ध्वनी हा उत्सवाचा भाग असला तरी संयम हीच संस्कृती आहे. ध्वनिक्षेपकाबाबत शासन, न्यायालय आणि प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन बृहन्मुंबई सार्वजनिक उत्सव समन्वय समितीने केले आहे. यंदाचा गणेशोत्सव १४ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होऊन २५ सप्टेंबर २०२६ रोजी विसर्जन सोहळ्याने संपन्न होणार आहे.

### महासंचालक आर. के. श्रीवास्तव निलंबित

**नवी दिल्ली:** हॉकी इंडियाच्या वर्तुळातून एक मोठी बातमी समोर येत आहे. संस्थेचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी हॉकी इंडियाचे महासंचालक कमांडर आर. के. श्रीवास्तव यांच्या विरोधात शिस्तभंगाची कडक कारवाई करत त्यांना निलंबित केले आहे. त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, महासंचालक पदाशी संबंधित सर्व जबाबदाऱ्या आणि अधिकार तात्काळ प्रभावाने वापरणे थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. हॉकी इंडियाने बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये श्रीवास्तव यांच्यावर कर्तव्यात कसूर आणि जाणीवपूर्वक सूचनांचे उल्लंघन केल्याचे अनेक गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत.

# स्वच्छ वायू सर्वेक्षणात छत्रपती संभाजीनगरची ऐतिहासिक मजल; देशात मिळवला सोळावा क्रमांक!

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर
महानगरपालिकेने पर्यावरण संवर्धन आणि वायू प्रदूषण नियंत्रण्याच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण 2026' मध्ये छत्रपती संभाजीनगरने अत्यंत चमकदार कामगिरी करत देशात सोळावा क्रमांक पटकावला आहे. दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या देशातील अडचळीच्या व विविध ४८ शहरांच्या श्रेणीमध्ये हा मान मिळाला असून, शहराने दोनशे पैकी १७८ गुण प्राप्त केले आहेत. विशेष म्हणजे, मागील वर्षी याच सर्वेक्षणात छत्रपती संभाजीनगर चौतीसाव्या क्रमांकावर होते. यंदा शहराने तब्बल अठरा स्थानांची मोठी झेप घेत देशातील आघाडीच्या शहरांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे, तसेच मागील वर्षाच्या पंचावन्न गुणांमधून थेट एकोणनव्वद किंवा १७८ गुणांपर्यंत मजल मारत लक्षणीय वाढ नोंदवली आहे.

शहराच्या हवेच्या गुणवत्तेत आणि एकूणच पर्यावरणपूरक व्यवस्थेत झालेली ही सुधारणा महानगरपालिकेच्या वतीने सातत्यपूर्णरीत्या राबविण्यात आलेल्या विविध प्रभावी उपाययोजनांचे फलित आहे. शहरात वायू प्रदूषण नियंत्रणासाठी धूळ नियंत्रण, बंदिस्त वाहनांद्वारे कचरा वाहतूक, उघड्यावर कचरा जाळण्यास प्रतिबंध, दंडात्मक कारवाईची कठोर अंमलबजावणी, पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर आणि हरित क्षेत्रात वाढ यांसारख्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. या सर्वंकष प्रयत्नांमुळे शहराचा हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक मागील वर्षी ९९ होता, तो यावर्षी घसरून ७६ वर आला असून, ही सुधारणा शहराच्या प्रगतीची साक्ष देणारी ठरली आहे.

शहरातील वायू प्रदूषणामध्ये रस्त्यांवरील धूळ हा सर्वात मोठा घटक मानला जातो. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी महानगरपालिकेमार्फत रस्ते व प्रमुख मार्गांची नियमित स्वच्छता, यांत्रिक पद्धतीने साफसफाई आणि रस्त्यांच्या कडांची स्वच्छता करण्यात येत आहे. धुळीचे पुनर्वितरण रोखण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात असून, यामुळे वाहनांच्या वर्दळीमुळे उडणारे धुळीचे कण हवेत मिसळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले आहे. कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही शहराने आदर्श पावले उचलली असून, संपूर्ण कचरा संकलन व वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी आता बंदिस्त वाहनांचा वापर केला जात आहे. याशिवाय रेफ्युज ट्रान्सफर स्टेशन यंत्रणेची प्रभावी अंमलबजावणी करून विविध भागांतून जमा झालेला कचरा ट्रान्सफर स्टेशनपर्यंत आणून तेथून मोठ्या क्षमतेच्या कॅप्सूल स्वरूपाच्या बंदिस्त वाहनांद्वारे प्रक्रिया केंद्राकडे पाठविला जात आहे. या आधुनिक व्यवस्थेमुळे कचऱ्याची वाहतूक अतिशय सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक झाली असून दुर्गंधी व हवेतील सूक्ष्म कणांच्या प्रसारास आळा बसला आहे.

महानगरपालिकेचे विविध विभाग, स्वच्छता कर्मचारी, शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि सुजाण नागरिक यांचे सामूहिक प्रयत्न आहेत. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पर्यावरण विभाग व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या नेतृत्वाखाली या सर्व मोहिमांना प्रभावी रूप देण्यात आले आहे. महापौर श्री. समीर राजूरकर यांनी या यशाबद्दल मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ही कामगिरी महानगरपालिकेच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे फलित आहे.

आगामी काळात 'स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त छत्रपती संभाजीनगर' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वायू प्रदूषण नियंत्रणाची ही मोहीम आणखी तीव्र केली जाईल, आणि पुढील सर्वेक्षणात शहर आणखी उच्च मानांकन प्राप्त करेल, असा पूर्ण विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे

## थोडक्यात वार्ता

### सौदी अरेबियावर हुतींचा मोठा ड्रोन हल्ला; दोन जण जखमी

**रियाद:** मध्य-पूर्वेतील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक स्फोटक आणि गंभीर होत चालली आहे. इराण आणि अमेरिकेमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, आता येमेनमधील हुती बंडखोरांनी सौदी अरेबियावर प्रत्यक्ष हल्ले तीव्र केले आहेत. हुतींनी सौदी अरेबियातील शरूराह येथील एका लष्करी तळाला लक्ष्य करून मोठा ड्रोन हल्ला केल्याचा दावा केला आहे. हुतींचे लष्करी प्रवक्ते याह्या सारी यांनी टेलिग्रामवर जारी केलेल्या निवेदनातून या हल्ल्याची माहिती दिली. त्यांच्या दाव्यानुसार, या हल्ल्यात मोठ्या प्रमाणावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर करण्यात आला. हुतींनी सौदीच्या लष्करी तळावरील मुख्य शस्त्रसाठा केंद्र आणि कमांड-अँड-कंट्रोल रूमला लक्ष्य करत अचूक वेध घेतल्याचे यात म्हटले आहे. येमेनविरोधात सौदी अरेबियाकडून सुरू असलेल्या कारवाईला हे प्रत्युत्तर असल्याचे सांगत, सौदीने हल्ले न थांबवल्यास आगामी काळात देशाच्या अंतर्गत भागात आणखी घातक हल्ले करण्याचा इशारा बंडखोरांनी दिला आहे.

### दुचाकीची समोरासमोर धडक दोन जण ठार

**राहुरी :** नगर-मनमाड राज्य महामार्गावर हॉटेल रुबाब समोर गुरुवारी रात्रीच्या सुमारास दोन दुचाकींची समोरा समोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून एक महिला व एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. शहरातील शुभम तनपुरे व अनिकेत तनपुरे हे दोघेजण रात्री ११.३० वाजे दरम्यान दुचाकी क्रमांक एम एच १७ डिके ४४११ वरून घरी जात होते. त्याचवेळी अकोले येथील ऋषिकेश बाळासाहेब गिन्हे वय १९ वर्षे हा एका महिले सोबत दुचाकी क्रमांक एम एच १७ सी डब्लू ६८११ या दुचाकीवरून राहुरी फॅक्टरीकडून राहुरीकडे जात होते. ते पूढे मढी येथे दर्शनासाठी जाणार होते. दरम्यान नगर- मनमाड राज्य महामार्गावरील हॉटेल रुबाब समोर दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात ऋषिकेश बाळासाहेब गिन्हे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या अनिकेत तनपुरे याला उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. तसेच शुभम तनपुरे व एका महिलेवर राहुरी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामुळे नगर-मनमाड महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते व पोलिस हेड कॉन्स्टेबल संदीप ठाणगे हे करीत आहे.

### गांजा प्रकरणातील फरार आरोपी ओडिशातून अटक

**कन्नड :** दि.१३ सप्टेंबर - गांजा तस्करीप्रकरणी कन्नड शहर पोलिस ठाण्यात २०२५ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यात तब्बल वर्षभरापासून फरार असलेल्या आरोपीस पोलिसांनी ओडिशा राज्यातून अटक केली. अमनपाल सुशांतपाल (रा. मोहना, ओडिशा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कन्नड शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यातील कलम ८, २०, २५ आणि २९ अंतर्गत गांजाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात अमनपाल सुशांतपाल हा आरोपी फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू होते. अखेर पोलिस पथकाने तपासाच्या आधारे आरोपीचा ओडिशा राज्यातील मोहना येथे ठावठिकाणा शोधून काढत त्याला अटक केली.ही कारवाई पोलिस अधिक्षक प्रकाश जाधव,सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री, तसेच परिविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# चांगला पाऊस पडू दे; बळीराजा सुखावू दे!

### आ. विलास भुमरेंचे गणरायाला साकडे; श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पाण्याअभावी हाताशी आलेल्या पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. राज्यात चांगला पाऊस पडून बळीराजा सुखावावा, यासाठी पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांनी रविवारी (दि. १३) श्री गणरायाला साकडे घातले.



निराला बाजार येथील जिल्हा श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते रविवारी थाटात झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा श्री गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, खासदार डॉ. कल्याण काळे, माजी खासदार इम्तियाज जलील, महापौर समीर राजूरकर, मनपा स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, पोलिस आयुक्त प्रविण पवार, मनपा आयुक्त अमोल येडगे, मनपा उपायुक्त नंदकिशोर भोंबे, क्रांती चौक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिवाजी तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे यांनी स्वागत केले. पोलिस आयुक्त प्रविण पवार यांनी शहरातील गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. यंदाचा गणेशोत्सव 'डीजे'मुक्त साजरा करून पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशांना प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सार्वजनिक गणेश मंडळांसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने 'माझा बाप्पा, स्वच्छतेचा राजा' ही अभिनव स्पर्धा आयोजित केल्याची माहिती दिली. सर्व गणेश मंडळांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्याध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात, राजू बागडे, कृष्णा बनकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण डोणगावकर, संतोष जेजुरकर, मिल्लू चावरिया, किशोर तुळशीबागवाले, सुरेश टाक, विजय सुबूकुडे, माजी नगरसेवक भाऊसाहेब जगताप, राहुल सावंत, पप्पू ठुबे, सुनील कोटकर, नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल, मनसे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींनी देशात 'पॉलिटिक्स फॉर परफॉर्मन्स' रुजवले - अमित शाह



**मुंबई :** भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीच्या राजकारणातून देशाला बाहेर काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत 'पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्स'ची नवी दिशा दिली आहे. राष्ट्रवाद आणि 'भारत प्रथम' ही धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे बनली असून, सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन आता परिणाम, उपलब्धी आणि जनतेपर्यंत पोहोचणाऱ्या योजनांच्या आधारे होऊ लागले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी केले. नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'ची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबरला जन्मदिन असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधानपदाच्या सार्वजनिक कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत.

# पाण्याची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त एकरी उसाचे उत्पादन वाढवा : विखे पाटील

**शिर्डी :** "कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाचे क्षेत्र वाढले तरच सहकारी साखर कारखान्यांच्या अर्थकारणाला भक्कम पाठबळ मिळणार आहे. पाण्याची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त एकरी उसाचे उत्पादन वाढवा," असे आवाहन करतानाच, जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी विविध सिंचन प्रकल्पांना महायुती सरकारने मोठा निधी मंजूर केला आहे. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविण्याच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या ७७ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यातील पाणी प्रश्नावर सविस्तर भाष्य केले. या सभेस माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, ट्रक वाहतूक संस्थेचे चेअरमन नंदू राठी, व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, सोपानराव शिरसाठ, शांतीनाथ आहेर, अण्णासाहेब कडू, कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना ना. विखे पाटील म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली आहे. डॉ. सुजय विखे पाटील आणि त्यांच्या सर्व संचालक मंडळाने अतिशय कमी कालावधीत नव्या प्रकल्पाची उभारणी केल्यामुळे यंदा चांगल्या पद्धतीने गाळप करता आले. अशक्य ते शक्य करून दाखविण्याची ताकद ही प्रवरेत असल्यामुळेच आपल्या कारखान्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

# औराळा ते निपाणी रस्त्याचे आमदार सौ. संजनाताई जाधव यांच्याहस्ते भूमीपूजन

**कन्नड प्रतीनिधी :** कन्नड तालुक्यातील औराळा निपाणी या रस्त्याचे मूख्यमंत्री ग्राम सड़क योजने अंतर्गत सिमेंट रस्त्याचे

उद्घाटन आमदार सौ . संजनाताई जाधव यांच्या हस्ते मंगळवारी दि 8 सप्टेंबर रोजी श्रीफळ फोडून करण्यात आले . सहा किलोमीटर 100 साठी 7 कोटी रूपये निधी मंजूर करण्यात आला आहे . असे त्यांनी कार्यँक्रमात बोलताना सांगितले . यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमूख व कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ मनोज राठोड , ऊपसभापती जमेश बोरसे ,खरेदी विक्रि संघाचे सभापती ज्ञानेश्वर बोरसे , माजी उपसभापती गिताराम पवार ,सूनील निकम ,रामेश्वर घनकर,रामुकाका पवार



,शहरप्रमूख शिवाजी थेटे उपतालूकाप्रमूख अप्पानाना पवार ,संभाजी गोडसे ,वाल्मिक खैरणार ,गोकुळ नलावडे ,अप्पा भोजणे,प्रवीण धाटबळे ,सोमनाथ जाधव ,आकाश झिमन ,गोविंद भोजणे ,

श्री मनोहर पा बोरसे मा.सरपंच श्री रूस्तुम आण्णा बोरसे मा.सरपंच श्री नानासाहेब बाबुराव पा बोरसे मा सरपंच श्री अशोक मधाने मा सरपंच श्री विश्वास बापू बोरसे चेअरमन श्री पंढरीनाथ कदम सरपंच, गजानन तात्या कुर्हाडे, किशोर कुर्हाडे, विठ्ठल कदम,

ह.भ.प.बाबुराव महाराज कदम , रावसाहेब निकम पो.पा ,गणेश बोरसे, तुकाराम मधाने, शिवाजी मधाने, गणेश मधाने,प्रताप सुर्यवंशी, बापू बोरसे मा, उपसरपंच, गोरख बोरसे,ज्ञानेश्वर केशवराव बोरसे , दत्तु कदम, नामदेव कदम ,भाऊसाहेब कदम , विष्णु काका,सुखदेव आप्पा बोरसे गणेश निकम, बंडु बोरसे,बाळु धनेश्वर, अरुण पगारे नामदेव कूहाडे ,सौ मंगलबाई बोरसे चेअरमन सौ शोभाबाई मधाने मा सरपंच ग.भा.सिंधुबाई सुर्यवंशी मा सरपंच सौ प्रमिला बाई बोरसे सौ कविता बोरसे सौ उज्वला बोरसे सौ पुजा बोरसे सौ संगिता बोरसे सौ मिराबाई निकम आदिसह गावातील परीसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# उरणच्या प्रकल्पग्रस्तांना मोठा दिलासा; 256 कुटुंबांची यादी अंतिम करण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश

## ४० वर्षांच्या संघर्षाला आता न्यायालयीन लढ्यामुळे मिळाली निर्णायक दिशा

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

उरण /रायगड - जेएनपीटी (जेएनपीए )हे जागतिक बंदर रायगड जिल्ह्यात उरण तालुक्यात समुद्रकिनारी असून हे बंदर स्थापन होताना येथील मूळ स्थानिक रहिवाशी असलेल्या नागरिकांना दुसऱ्या ठिकाणी कायमचे योग्य ते पुनर्वसन न करता तात्पुरते इतर ठिकाणी हालवले. जुना शेवा कोळीवाडा येथे बंदर साठी जागा संपादित केली त्यामुळे येथील रहिवाशी यांना अनुक्रमे हनुमान कोळीवाडा व नवीन शेवा येथे तात्पुरते पुनर्वसन केले. पुनर्वसन केलेल्या जागी आजपर्यंत केंद्र व राज्य शासनाने कोणतेही मूलभूत सेवा सुविधा पुरविल्या नाहीत व योग्य ते पुनर्वसन सुद्धा केले नाही. त्यामुळे अनेक वेळा, वारंवार संप, उपोषण, आंदोलन,लोकशाही व कायदेशीर मार्गाने पत्रव्यवहार करून सुद्धा ४० वर्षे उलटून





सुद्धा आजही विस्थापितांना, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नाही. त्यांचे योग्य पुनर्वसन झाले नाही. त्यांच्या सर्व मागण्या सुरवातीपासूनच प्रलंबित राहिल्या. केंद्र व राज्य शासन कोणतेही दाद देत नसल्याने सदर प्रश्न मुंबई उच्च न्यायालयात गेला. व तिथे या प्रश्नावर कायदेशीर लढाई सुरु झाली.व याबाबतीत केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेवर व प्रकल्पग्रस्त, विस्थापित यांच्यावर ४० हुन जास्त वर्षे होत असलेल्या अन्यायाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. अजूनही केंद्र सरकार व राज्य सरकारने पुनर्वसन न केल्याने न्यायलयाने सकारात्मक पाऊले उचलत पुनर्वसन लवकर करण्याचे निर्देश दिले आहेत.

उरण परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश देत प्रकल्पग्रस्तांना मोठा दिलासा दिला आहे. महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर्स युनियन व अन्य विरुद्ध जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण व अन्य या रिट याचिका क्र. ८६५५/२०२५ प्रकरणात ११ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती मनिष पितळे व न्यायमूर्ती श्रीराम व्ही. शिरसाट यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रकल्पग्रस्त/लाभार्थी कुटुंबांच्या पात्रतेची पडताळणी प्रक्रिया २०२३ मध्येच पूर्ण झाल्याचे नोंदविण्यात आले आहे. पनवेलचे उपविभागीय अधिकारी (एस डी ओ ) यांनी २ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड यांना पाठविलेल्या पत्रासोबत २५६ प्रकल्पग्रस्त कुटुंबांची यादी पाठविण्यात आली होती. ही यादी जिल्हाधिकारी कार्यालयास १७ फेब्रुवारी २०२३ रोजी प्राप्त झाल्याचेही न्यायालयाच्या आदेशात नमूद आहे.

या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने स्पष्ट निर्देश देत २ फेब्रुवारी २०२३ रोजी एस डी ओ यांनी पाठविलेली २५६ कुटुंबांची यादी ही नव्या ठिकाणी पुनर्वसित करण्यात येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची अंतिम यादी म्हणून ग्राह्य धरावी, असे आदेश दिले आहेत.

तसेच, आदेशाच्या तारखेपासून एका आठवड्याच्या आत जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन गावठाणात जाण्याची १८० कुटुंबांनी संमती दिली आहे त्या कुटूंबांची अंतिम यादी जेएनपीटी (जेएनपीए )कडे द्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतर जेएनपीए ने केंद्र सरकारच्या संबंधित विभागाला आवश्यक बाबींची पूर्तता झाल्याबाबत कळविण्याची कार्यवाही दोन आठवड्यांत पूर्ण करावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० सप्टेंबर २०२६ रोजी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाला आता निर्णायक दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## "शाल जोडे"



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## एमएच-सीईटी परीक्षेतील गैरप्रकार आणि डेटा लीक प्रकरण

राज्यातील उच्च व व्यावसायिक शिक्षण प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या एमएच-सीईटी (MH-CET) परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि पारदर्शकतेबाबत निर्माण झालेल्या शंकांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. एमएच-सीईटी परीक्षेतील गैरप्रकारांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तक्रार असलेल्या सर्व सीईटी केंद्रांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचे निर्देश दिले आहेत या निर्णयामुळे परीक्षा प्रणालीतील त्रुटी दूर होऊन गुणवत्तेला न्याय मिळेल, असा विश्वास विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण होत आहे. गेल्या महिनाभरापासून एमएच-सीईटी परीक्षेतील कथित घोळ, पर्सेंटाइलमधील विसंगती आणि डेटा लीक यांसारख्या मुद्द्यांवरून विद्यार्थी आणि पालकांमध्ये असंतोष पसरला होता. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्यभरातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. शिष्टमंडळाने मांडलेल्या सर्व तक्रारी गांभीर्याने ऐकून घेतल्यानंतर, ज्या केंद्रांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्या सर्वांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचे आणि डेटा लीक प्रकरणाचा तपास सहपोलिस आयुक्तांमार्फत एफआयआर दाखल करून करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत परीक्षा ऑनलाइन घेण्याऐवजी पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने घ्यावी, अशी मागणीही यावेळी रेटण्यात आली. या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती पाहता, दोषी आढळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वा यंत्रणेला पाठीशी घातले जाणार नाही, असा सज्जड दम प्रशासनाकडून भरण्यात आला आहे. मुंबई पोलीस आयुक्तांना यासंदर्भातील आदेश तत्काळ देण्यात आले असून, पारदर्शक आणि निष्पक्ष तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या पवित्र्यात कसलाही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही, ही शासनाची भूमिका विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# दहशतवाद व आर्थिक गुन्हे

अमेरिकेतील न्यु य़ॉर्क येथे 9 सप्टेंबर 2001 मधे दहशतवादी हल्ला झाला त्याला 25 वर्षे पूर्ण झाली. त्यात 3000 हून अधिक लोक मृत्यु पावले. हा हल्ला करणारे अल् कायदा चे अनेक महत्त्वाचे म्होरके जसे ओसामा बिन लादेन, जवाहिरी वगैरे मारले गेले असले तरी ह्या गटाचे सदस्य आता सोमालिया व पश्चिम आफ्रिकेतील साहेल प्रांतातुन कार्यरत आहेत. शिवाय ISIS अनेक भागातून हल्ले करत आहेत. भारतात वरील गटां शिवाय लष्कर ए तोयबा गेली अनेल दशके दहशतवादी हल्ले करत आहेत व त्यात हजारो लोक मृयु पावले आहेत. 2014 मधे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर व त्यापूर्वी भारतामधील दहशतवादाची परिस्थिती यामधे जमिन अस्मानाचा फरक पडला आहे. 2014 पूर्वी दिल्ली, जयपूर, मुंबई, नागपूर, पुणे बंगळुरू, हैद्राबाद, कोईमतूर अशा भारतातल्या प्रत्येक मोठ्या शहरामध्ये अनेकवेळा दहशतवादी हल्ले झाले होते. 2014 नंतर काश्मिरमधे दहशतवादी हल्ले झाले आहेत. परंतु 2019 मधे कलम 370 अ रद्द केल्यानंतर हे हल्ले ठोसपणे कमी झाले आहेत. 2025 मधे लाल किल्ल्याजवळ एका दहथवाद्याने केलेल्या स्फोटात 14 जण ठार झाले. इतरत्रही दहशतवाद्यांनी हल्ले करण्याचा प्रयत्न केला परंतु तत्पूर्वीच ह्या प्रयत्न करणार्यांना पकडण्यात आले. त्यामुळे त्यांना यश मिळाले नाही. त्यामुळे हे दहशतवादी प्रयत्न करतायत परंतु त्यापूर्वीच जागरूक असलेल्या सुरक्षा यंत्रणांनी त्यांच्यावर परिणामकारक कारवाई केली आहे.

जागतिक स्तरावर इंटरपोल तसेच विविध मित्र राष्ट्रांमधे असलेला समन्वय व संयुक्त राष्ट्रे ही दहशतवादाविरुद्ध काम करत आहेत. भारतात NIA (national investigation agency) राज्यामध्ये ATSS स्थानिक पोलीस हे एकमेकांशी समन्वय ठेऊन दहशतवाद विरोधी कारवाया करत असतात. ह्याशिवाय NCB (narcotics control Bureau) ही आमली पदार्थाविरोधी कारवाई करते. महाराष्ट्रात CID मधे आमली पदार्थ विरुद्ध Task Force ची निर्मिती करण्यात आली आहे.भारतातील तरुणाना अमली पदार्थांचे व्यसन लावून मिळालेल्या पैशाने अवैध शस्त्रे , दारुगोळा दहशतवाद्यांना पुरवणे हे नेहमीचेच झाले आहे. आर्थिक दहशतवादाविरुद्ध ED (Enforcement Directorate) कारवाई करते. सायबर गुन्ह्यांविरुद्ध केंद्र व राज्य पातळीवर विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे. ह्या सर्व सुरक्षा यंत्रणांमध्ये भारत सरकारचे गृह मंत्रालय व त्यात काम करणार्या सुरक्षा यंत्रणा सतत जागरूक राहून सर्व संबंधितांना माहितीची देवाण-घेवाण व देशाबाहेरील यंत्रणांशी समन्वय राखत असतात.

नवनवीन तंत्रज्ञान वापरून भारताबाहेरील दहशतवादी त्याचा गैरवापर करत आहेत. ह्यावर उपाय करण्यासाठी भारतातील पोलीस यंत्रणाही नवीन प्रशिक्षण व पायाभूत सुविधा ह्यांचा सक्षमतेने वापर करत आहेत. परंतु ही न संपणारी अशी प्रक्रिया आहे. दहशतवादामुळे बळी ठरलेल्या अनेक देशांनी जसे इस्रायल, फ्रांस, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, अमेरिका, भारत, रशिया हे एकत्र येऊन दहशतवादाच्या नवीन गुन्हेगारीविरुद्ध एकत्रितपणे प्रतिकार करीत आहेत.

दहशतवादाचा सामना ही सर्व लोकशाहीप्रेमी राष्ट्रातील सुरक्षा यंत्रणा, तसेच जबाबदार नागरीक ह्यांची संयुक्त जबाबदारी आहे. दहशतवादाविरोधी आधुनिक तंत्रज्ञान तसेच व्यक्तिकेंद्रित माहिती अचूकपणे मिळवणे आवश्यक आहे. Artificial Intelligence (AI) च्या मदतीने अचूक माहिती मिळविणे शक्य झाले आहे. तसेच मोबाईल वापरामुळे ह्या दहशतवाद्यांचे नेमके ठिकाण नक्की करण्यात बरीच मदत होत आहे. परंतु तरीही दहशतवाद्यांधील व्यक्तिंकडून अचूक माहिती मिळविण्यासाठी पोलीस मित्रांची फार मोठी आवश्कता आहे. सुरक्षा यंत्रणा व सामान्य माणसे ह्यातील दूरी हे पोलीस मित्र कमी करतात व आजूबाजूला घडत असणार्या संशयास्पद कारवायांची माहिती ते सुरक्षायंत्रणांना त्वरित देतात.

दहशतवादामधे देशांतर्गत दहशतवादी कारवाई करणारे व देशाबाहेरील दहशतवादाला प्रोत्साहन देणारे असे दोन मुख्य गट आहेत. देशामधे दहशतवादी कारवाया होणार नाहीत ह्यासाठी आाज देश मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला आहे. परंतु भारताची शत्रू राष्ट्रे भारतातील जनतेत धर्म, प्रांत, लिंग, भाषा, जात अशा विविध मार्गांनी असंतोष निर्माण करण्याचा व तुमच्यावर अन्याय होत आहे त्याचा तुम्ही प्रतिकार करावा ह्यासाठी प्रशिक्षण, शस्त्रे, दारुगोळा, अमली पदार्थ, दळणवळणाची साधने अशा अनेक प्रकारे मदत करत आहेत. ह्याशिवाय जनतेमधे बुद्धिभेद निर्माण करून भारतातील सुरक्षा यंत्रणांविरुद्ध सतत संशयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यातच पेड न्यूज, फेक न्यूज, फेक व्हिडिओज पसरविण्याचे तंत्र मोठ्या प्रमाणात विकसित करण्यात आले आहे.

दहशवाद्यांचा प्रयत्न असतो की देशातील लोकांकडूनच दहशतवादासाठी निधी मिळवायचा.त्यासाठी ते विविध उपाय करतात. जसेः आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, हवाला, भारतातील व बाहेरील लोकांकडून देणग्या, खंडणी, शेअर बाजारात गुंतवणुक करण्याचे खोटे आमिष, अमली पदार्थांची विक्री, वगैरे. सायबर गुन्ह्यात लुबाडलेले कोट्यावधी रुपये पाकिस्तानात दहशतवाद्यांना पोचतात असा संशय अहे. अनेक Bank officers, Chartered Accountants & mule account holders ह्यांना मदत करत आहेत. Popular Front of India (PFI) ह्या दहशतवादी संघटनेवर सरकारने बंदी घातली, त्यानंतर E D ने तपास केला तो अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

आर्थिक गुन्हे व दहशतवाद

ED ने केलेल्या तपासाप्रमाणे गेल्या काही वर्षात PFI च्या खात्यात 120 कोटी रुपये जमा झाले आहेत. हे पैसे भारतातून तसेच परदेशातून आले आहेत व त्यांचा उपयोग गैरकायदेशीर कृत्यांसाठी केला गेला. त्यांचा उपयोग करून 2020 मधे दिल्लीत दंगे घडवण्यात आले, तसेच K.A. Rauf Sherif जो PFI सदस्य व CFI (Campus Front of India) चा National General Secretary होता, त्याने परदेशातून 1.36 cr. जमा केले व निर्यातीच्या सामानासाठी आहेत असे दाखविले. त्याने हथरस उत्तरप्रदेश येथे दंगा करण्यासाठी 4 लोक पाठवले होते. त्यात त्याला फेब्रु. 2021 मधे अटक करण्यात आली.

ED च्या तपासाप्रमाणे केरळ येथील Munnar Villa Vista हा घर बांधणी प्रकल्प करायचा होता आणि मिळवलेले पैसे तिकडे वळवायचे होते. PFI चा कोषाध्यक्ष P. Koya ह्याने ED ला सांगितले की PFI ला परदेशातून पैसे मिळाले नाहीत. पण ED च्या तपासाप्रमाणे गल्फ देशातील हजारो लोकांनी जे PFI चे सक्रीय सदस्य आहेत त्यांनी PFI च्या अकांउंटमधे पैसे सामील केलेले नाहीत म्हणजे ते हवाला मार्गे PFI च्या सदस्यांच्या खात्यात आलेले आहेत.

120 कोटी कोणाकडून मिळाले ह्याचा सध्या तपास यंत्रणा तपास करीत आहेत. मल्लपुरम् व कोझिकोडे ह्या जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक, ह्यांनी PFI च्या खात्यात पैसे पाठवल्याचे आढळले आहे. मल्लपुरम् येथे राहणार्या अबूबकर पझेदाथ याचे निवासस्थान व कार्यालय येथून सोने व मोठी रोकड रक्कम ED ने नुकतीच जप्त केली होती. राजनैतिक अधिकार्यांना असलेल्या सवलतींचा गैरफयदा घेउन हे सोने भारतात आणले गेल्याचा संशय आहे. या व्यक्तीचा PFI शी थेट संबंध नसला तरी बंदी घलण्यात आलेल्या या संघटनेच्या खात्यात पैसे हस्तांतरित करीत असल्याचा त्याच्यावर संशय आहे. अबू बकरशी संबंधित असलेल्या अन्य काही उद्योजकांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यावर काहींनी आपल्याकडील काळा पैसा PFI ला देणगी म्हणून दिल्याचे वृत्त आहे. कोट्टाकल, चनकुवेट्टी, इदरीकोड, रानदधानी आणि पोनमला या मल्लपुरम् जिल्ह्यातील गावामधील फर्निचरचे व्यापारी, दागिन्यांचे दुकानदार,पर्यटन व्यावसायिक यांच्या कार्यालयांची झडती घेऊन काही कागदपत्रे जप्त केली आहेत. PFI चा नेता मोहम्मद शेफिक ह्याने दिलेल्या माहितीच्या आधारे तपास होत आहे. हे पैसे 2020 साली दिल्लीत झालेल्या दंगलीवर खर्च केल्याचा आरोप होत आहे.

18 October 2024 रोजी ED ने 35 स्थावर मिळकती ज्यांची किंमत 56.56 कोटी आहे जप्त केल्याचे सांगितले, ह्या मिळकती PFI नियंत्रित करीत होती व त्याचा फायदा त्यांनाच मिळत होता. तपासात निष्पन्न झाले की PFI चे गल्फ मधे कुवेत, ओमान,कतार, सोदी अरेबिया, UAE, तसेच सिंगापुर मधे 13000 सक्रीय सदस्य आहेत. भारताबाहेरील ह्या लोकांची District Executive Committee (DEC) स्थापन करून त्यांना निधी गोळा करण्याची जबाबदारी दिली होती. हा निधी हवाला तसेच संशयित बँक माध्यमातून PFI च्या दहशतवादी व संशयित कारवायांसाठी वापरला जात असे. पैसे कोणी दिले आहेत, ते कळणार नाही ह्याची खात्री केली जात असे. PFI च्या घटनेत दिलेल्या समाजसेवा ह्या उद्दिष्टांपेक्षा हा पैसा भारतात जिहाद मार्गे इस्लामिक चळवळ वाढवण्यासाठी वापरला जात होता. त्याचा उपयोग हिंसक कृत्ये करण्यसाठी केला जात असे. समाजात विद्वेष पसरवणे, अशांतता निर्माण करणे, भारताचे सार्वभौमत्व कमी करणे व गृह युद्धाची तयारी करणे हे खरे उद्दिष्ट होते. त्यासाठी, शारीरिक शिक्षणाच्या नावाखाली विविध प्रकारे ठोसे, लाथा मारणे, लाठी चालवणे, सुरा चालवणे ह्यामधून गृह युद्धाची तयारी करून घेतली जात होती. त्यातील काही प्रकार असे होते; Steps for preparation for civil war, by creating unrest and strife in the society that includes non-violent air raids, Guerilla Theatre, Alternative Communication Systems, etc. Methods of cruelty and subjugation include Haunting officials, Taunting officials, Fraternization, Mock Funerals, Interdict, Lysistratic Non-action (means withhold sex from someone in order to achieve something) etc. सार्वभौमत्व व भारताची एकी कमी करण्यासाठी कायदे भंग करणे, दोन सार्वभौमत्व मानणे, समांतर सरकार चालवणे,गुप्त हेरांची माहिती उघड करणे हे प्रकार होते. हे सर्व प्रशिक्षण वर्ग खोट्या मालकीच्या नावाने चालवले जात होते, PFI च्या नावे एकही जागा नव्हती. असाच एक वर्ग 2013 नारा शस्त्र प्रशिक्षणाचा होता ज्यात दारुगोला व शस्त्रे वापरून दोन धर्मात तेढ निर्माण करणे व त्यांना दहशतवादी कृत्यांसाठी तयार केले जात होते

ह्यामुळे सामान्य व्यक्तींनीही जागरुक राहून कळत नकळत आपण दहशतवादी कृत्यांनना मदत करत नाहियोत हयाकडे सतत लक्ष देणे गरजेचे आहे. ही लढाई आापण सर्व मिळुन जिंकायची आहे व आपले स्वातंत्र्य अबाधित राखायचे आहे.

**प्रवीण दीक्षित,**
**निवृत्त पोलिस महासंचालक**

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (Standstill Agreement) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला.

हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

मराठवाड्यात जागृतीची बीजे

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले.

या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या



हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला.

प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

निजामाची आणि भारताची भूमिका

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर :** मुक्ती संग्राम दिन

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो.

मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे.

१७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी





जिंतूर - महाराष्ट्र शासनाच्या परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून गुलाबराव शिंदे व मंचक जगताप यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा जिंतूरच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्या वेळी देवगिरी प्रांत पर्यावरण प्रमुख डॉ. सौ.संगीता अवचार, विधी आयाम प्रमुख अँड संजय केकण, सचिव सचिन रायपत्रीवार, आशाताई खिल्लारे, आबासाहेब जाधव, चंद्रकांत गवळी, लक्ष्मी राठोड, आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी असोशियन संघटना तालुका कार्यकारिणी जाहीर

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी .छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील तालुका कार्यकारिणी तालुका अध्यक्ष सौ सुवर्णा अर्जुन तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत खालील कार्यकारणी जाहीर केली. तालुका उपाध्यक्ष पदी सौ रंजना काकडे. छाया राजेंद्र पवार पाटील. सचिव पदी सौ मंगल मांडवगड कोषाध्यक्ष सौ वर्षा खारात . सौ सहसचिव मुकता खजिनदार . तालुका संघटक रुखमन बोराडे संपर्कप्रमुख सौ कमल सुधाकर साबळे. ज्योती किशोर शिंदे प्रचार प्रसिद्धी प्रमुख यांच्यासह प्रमुख कार्यकारणी जाहीर करण्यात करण्यात आली .

## आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सिल्लोड शहरात पोलिसांचा फ्लॅग मार्च



**अजींठा प्रतिनिधी :** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच हुल्लडबाज व समाजकंटकांमध्ये पोलिसांचा व कायद्याचा धाक निर्माण व्हावा, या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांतर्फे संपूर्ण जिल्ह्यात रूट मार्च व फ्लॅग मार्चचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने आज दिनांक १२ सप्टेंबर २०२७ रोजी सायंकाळी सिल्लोड शहरात पोलीस उपअधीक्षक श्री. विश्वजीत काइंगडे यांच्या नेतृत्वाखाली फ्लॅग मार्चचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्यामसुंदर कावठाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद भिंगारे, पोलीस उपनिरीक्षक धम्मदीप काकडे, सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार रविंद्र ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक जाधव यांच्यासह दोन्ही पोलीस ठाण्यांतील अधिकारी व अंमलदार, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस मुख्यालयातील कमांडोंची एक तुकडी तसेच होमगार्ड्स सहभागी झाले होते.

सदर फ्लॅग मार्च सिल्लोड शहरातील प्रमुख व संवेदनशील मार्गांवरून काढण्यात आला. पोलिस अधिकारी व अंमलदारांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संचलन पूर्ण केले.

आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांनी निर्भय वातावरणात सण साजरे करावेत आणि कोणत्याही प्रकारच्या अनुचित प्रकाराला आळा बसावा, यासाठी सिल्लोड पोलिसांकडून प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. सिल्लोड शहरातील हुल्लडबाज आणि समाजकंटकांना याआधीच योग्य तो संदेश मिळाला आहे सदरच्या रूटमार्च मुळे त्यांच्या अजून जरब बसण्यास मदत झाली आहे

## श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त अभिवादन



**हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी : परभणी :** महानुभाव पंथाचे संस्थापक तथा मानवतेचा संदेश देणारे श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार जनार्दन रेड्डी, अव्वल कारकून शरद मगर, अर्जुन कांदे, विश्वनाथ कनके आदी उपस्थित होते.

# आज मंगलमूर्तीचे मांगल्यदायी आगमन!; ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात शहर दुमदुमणार; मूर्ती, सजावट साहित्य खरेदीसाठी बाजारपेठेत झुंबड

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चौसष्ट कलांचा अधिपती, गजपती, रिद्धी-सिद्धीचा नायक असलेल्या लाडक्या गणरायाचे सोमवारी (१४ सप्टेंबर) ढोल-ताशांच्या दणदणाटात आणि गुलाल-पुष्पांच्या उधळणीत थाटात आगमन होणार आहे. ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, आले रे आले गणपती आले’च्या जयघोषाने शहर दुमदुमणार असून, घरोघरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांकडून बाप्पाच्या स्वागताची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. यंदा गणरायांचा मुक्काम तब्बल बारा दिवस राहणार असल्याने गणेशभक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठांमध्ये गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. गारखेडा परिसरातील गजानन महाराज मंदिर ते सेव्हन हिल परिसरासह औरंगपुऱ्यातील जिल्हा परिषद मैदान, गुलमंडी, शहागंज, राजा बाजार, कुंभारवाडा, रंगारगल्ली, सुपारी हनुमान मंदिर, गुरुगोविंदसिंगपुरा, जवाहर कॉलनी, शिवाजीनगर, सुतगिरणी चौक, जयभवानीनगर, मुकुंदवाडी, सिडको, टीव्ही सेंटर, हर्सूल टी पॉईंट, छावणी, बेगमपुरा, मिटमिटा-पडेगाव, चिकलठाणा आदी भागांतील गणेशमूर्ती विक्री केंद्रांवर भक्तांची गर्दी दिसून येत आहे.

विविध आकारांच्या आकर्षक गणेशमूर्तींसह मखर, कृत्रिम फुलांच्या माळा, विद्युत रोषणाई, पूजेचे साहित्य आणि प्रसादाची खरेदी केली जात आहे. यंदा शाडू तसेच लाल मातीच्या गणेशमूर्तींनाही मोठी मागणी आहे. मूर्तींच्या किमतीत गतवर्षीच्या तुलनेत सुमारे २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.



घरोघरी बाप्पाच्या स्वागताची लगबग

सार्वजनिक गणेश मंडळांसोबतच घराघरांतही गणरायाच्या स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विविध प्रकारची मखरे तयार केली जात असून, फुलांची आरास आणि आकर्षक विद्युत रोषणाई केली जात आहे. थर्माकोलच्या वापरावर बंदी असल्याने प्लायवूड, पुठ्ठा आणि प्लास्टिक पाईपचा वापर करून मखरे तयार केली जात आहेत. बच्चे कंपनीमध्येही गणेशोत्सवाचा उत्साह दिसून येत आहे.

ढोल-ताशांच्या खरेदीलाही वेग

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पैठणगेट, टीव्ही सेंटर, कॅनॉट गार्डन आणि गजानन महाराज चौक परिसरात ढोल-ताशांची दुकाने थाटण्यात आली आहेत. विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी ढोल-ताशांची खरेदी करत असून, यामुळे विक्रेत्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

कृत्रिम फुलांना मोठी मागणी

गणेशमूर्तीसमोरील आरास सजविण्यासाठी कृत्रिम फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात असल्याने बाजारात त्यांची मागणी वाढली आहे. विविध रंग आणि आकारांतील कृत्रिम फुलांच्या माळा खरेदी करण्यासाठी महिला आणि बच्चे कंपनीची गर्दी होत आहे.

प्रसादही महागला

साखरेच्या दरवाढीचा परिणाम गणेशोत्सवातील प्रसादाच्या किमतीवरही झाला आहे. पंचखाद्याची खिरापत, पेढे, बुंदीचे लाडू, शेंगदाणा चिक्की, उकडीचे मोदक, पेढ्यांचे मोदक, राजगिरा लाडू तसेच विविध फळांच्या किमतीत यंदा वाढ झाली आहे. प्रसादाचे साहित्य साधारण २५ ते ३० टक्क्यांनी महागल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

**प्रतिष्ठापनेसाठी दिवसभर मुहूर्त :** सोमवारी हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी आल्याने महिलांसह गणेशभक्तांची धावपळ होणार आहे. सकाळी हरतालिका पूजन केल्यानंतर गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करता येणार असून, दिवसभर प्रतिष्ठापनेसाठी मुहूर्त असल्याचे वेदशास्त्र उद्धव गुरूजी वजूरकर यांनी सांगितले.

श्रीसंस्थान गणपतीतर्फे विविध कार्यक्रम

राजाबाजार येथील श्रीसंस्थान गणपती ट्रस्टतर्फे गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ सप्टेंबर रोजी गणेशमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना, पूजा, आरती आणि अहवालाचे विमोचन होणार आहे. तसेच श्री अथर्वशीर्ष सहस्रावर्तन पठण, अन्नदान भंडारा, रक्तदान शिबिर, चित्रकला स्पर्धा आणि दीपोत्सव आदी कार्यक्रम होणार आहेत. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गणेशमूर्तीची विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत तसेच विविध सामाजिक संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याचा उपक्रमही ट्रस्टतर्फे राबविला जातो. नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## वेरूळ गुरुकुलमध्ये भव्य 'तत्वार्थ सूत्र महामंगल विधान' आणि 'दशलक्षण पर्व' उत्साहात संपन्न होणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर

पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुलमध्ये जैन धर्मीयांचे सर्वोच्च व पवित्र धार्मिक पर्व मानल्या जाणाऱ्या 'दशलक्षण महापर्व' निमित्त विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १६ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत वेरूळ गुरुकुल येथे हे पर्व अत्यंत भक्तिभावाने साजरे होणार असून, या महोत्सवांतर्गत परम पूज्य आचार्य श्री १०८ नियमसागर महाराज आणि मुनिश्री सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे.

या १० दिवसीय महोत्सवाच्या तयारीचा आरंभ दिनांक १५ सप्टेंबर रोजी मंडप शुद्धी आणि घटयात्रेने होईल. त्यानंतर दिनांक १६ सप्टेंबरपासून दररोज सकाळी ६.०० वाजता नियमितपणे अभिषेक, पूजन आणि बोल्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संपूर्ण पर्वादरम्यान दररोज दुपारी ३.०० वाजता मुनिश्री नियमसागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांचे मंगल प्रवचन संपन्न होईल, ज्याचा लाभ भाविकांना घेता येईल. याशिवाय, दिनांक १९ सप्टेंबर रोजी पुष्पदंत भगवान मोक्ष कल्याणक निमित्त आणि दिनांक २५ सप्टेंबर रोजी वासूपूज्य भगवान मोक्ष कल्याणक निमित्त भव्य निर्वाण लाडू चढविण्यात येणार आहे. या धार्मिक पर्वाच्या सांगता प्रसंगी दिनांक २६ सप्टेंबर रोजी विश्व शांती हेतू भव्य होम-हवन आयोजित करण्यात आले आहे.

या महोत्सवासाठी बाहेरून येणाऱ्या सर्व भाविकांच्या निवासाची आणि शुद्ध भोजन-प्रसादाची उत्तम व्यवस्था गुरुकुलच्या वतीने करण्यात आली आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन बाल ब्रह्मचारी मनीष भैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. सकल जैन समाजाने या धार्मिक महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभाचे धनी व्हावे, असे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक वर्धमान पांडे, अध्यक्ष दिनेश गंगवाल, महामंत्री प्रेमचंद पाटणी, सहसचिव गौतम ठोले, कोषाध्यक्ष सुमित ठोले, मदनलाल पांडे, निर्मलकुमार ठोले, गुलाबचंद बोराळकर, पर्यवेक्षक सुकुमार नवले तसेच अतुल बांदे, सुहास मिश्रीकोटकर, पियूष कासलीवाल आणि नरेंद्र अजमेरा यांनी केले आहे.

## सिल्लोडमध्ये पैठणी उद्योग उभारण्यासाठी आ. सत्तारांचा पुढाकार



सिल्लोड प्रतिनिधी : सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोड येथे पैठणी उद्योग सुरू करण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी पुढाकार घेतला आहे. याच अनुषंगाने त्यांनी येवला, जि. नाशिक येथे कापसे फाउंडेशनच्या ‘कापसे पैठणी’ फॅक्टरीला भेट देऊन पैठणी उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे स्वरूप तसेच रोजगारनिर्मितीच्या संधींची माहिती जाणून घेतली. तसेच आमदार अब्दुल सत्तार यांनी फॅक्टरीतील विणकर कामगारांशी संवाद साधून त्यांच्या कामाची पद्धत, अडचणी तसेच रोजगाराच्या संधींबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी कापसे पैठणीचे संचालक बाळकृष्ण कापसे यांनी पैठणी उत्पादनाबाबत सविस्तर माहिती दिली. विशेष म्हणजे या फॅक्टरीमध्ये दिव्यांग, निराधार, मूकबधिर तसेच विधवा महिलांना रोजगार देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचे काम केले जात असल्याचे आमदार सत्तार यांनी पाहिले. या उपक्रमाचे कौतुक करताना अशा माध्यमातून गरजू महिलांना रोजगाराचा आधार मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिल्लोड येथील नॅशनल सहकारी सूतगिरणी येत्या काही दिवसांत सुरू होणार असून, त्यानंतर ‘कापूस ते कापड’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने पैठणी उद्योग महत्त्वाचा ठरू शकतो. सिल्लोड-सोयगाव परिसरात मोठ्या प्रमाणात गुणवत्तापूर्ण कापसाचे उत्पादन होत असल्याने या उद्योगासाठी स्थानिक पातळीवर अनुकूल वातावरण असल्याची चर्चा यावेळी झाली. आमदार सत्तार यांनी नॅशनल सहकारी सूतगिरणीबाबतही बाळकृष्ण कापसे यांना माहिती दिली.

कापसे पैठणीच्या प्रकल्पाची पाहणी करून हा उपक्रम शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असून, शासनाचे सहकार्य मिळाल्यास महिला, दिव्यांग, निराधार तसेच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोडमध्ये मोठा उपक्रम उभा राहू शकतो, असा विश्वास आमदार सत्तार यांनी व्यक्त केला. सिल्लोड येथे पैठणी उद्योग उभारण्यासाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा करण्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आमदार सत्तार यांनी येवला येथील प्रसिद्ध पंडित पैठणी दुकानालाही सदिच्छा भेट देऊन पैठणी उद्योगातील बाजारपेठ, मागणी आणि ग्राहकांच्या पसंतीबाबत माहिती घेतली.

यावेळी माजी उद्योग संचालक डॉ. जे. के. जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनोज राठोड, सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पाटील तायडे, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन पाटील गाढे, माजी पंचायत समिती उपसभापती अजिज शेठ बागवान, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक सयाजीराव वाघ, भोकरदन चे माजी पंचायत समिती सदस्य सोमनाथ हराळ, शकील जहागिरदार, रिजवान शेख आदी उपस्थित होते.

# नागरिकांनी अनावश्यक वस्तू खरेदी टाळा

### डॉ. सौ. संगीता अवचार यांचे प्रतिपादन; जिंतूर येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायत बैठक



**जिंतूर प्रतिनिधी :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिंतूर तालुका शाखेची बैठक शनिवारी दुपारी उत्साहात पार पडली. या बैठकीत परभणी जिल्हा पालक अधिकारी तथा देवगिरी प्रांत पर्यावरण प्रमुख डॉ. सौ. संगीता अवचार यांनी उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाविषयी सविस्तर मार्गदर्शन करत नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. संगीता अवचार म्हणाल्या, "नागरिकांनी अनावश्यक वस्तू खरेदी करण्याचा मोह टाळला पाहिजे, कारण अतिरिक्त उपभोग आणि नको असलेल्या वस्तूंच्या निर्मितीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होतो. अनेक व्यापारी 'एका वस्तूवर दोन फ्री' अशा ऑफर्स देतात. मात्र अशा ऑफर्सला न भुलता वस्तूची गुणवत्ता आणि तिची प्रत्यक्ष गरज तपासूनच खरेदी करावी."

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिंतूर तालुका अध्यक्ष मंचक देशमुख यांनी भूषवले. ग्राहक सभासद नोंदणीचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संपूर्ण टीमचे अभिनंदन करण्यात आले व मंचक देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हा अध्यक्ष गुलाबराव शिंदे उपस्थित होते. यावेळी देवगिरी प्रांत विधी आयाम प्रमुख अॅड. संजय केकन यांनी महावितरण/विद्युत वितरण विषयावर तसेच मध्यस्थी संदर्भात सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.

या बैठकीला जिंतूर तालुक्यातील पदाधिकारी चंद्रकांत गवळी, सचिव सचिन रायपत्रीवार, संदीप माहूरकर, आबासाहेब जाधव, प्रल्हाद टाकरस, श्याम रेघाटे, प्रभाकर डोईफोडे, आशाताई खिल्लारे यांच्यासह ग्राहक पंचायतीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन रायपत्रीवार यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष मंचक देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शैक्षणिक नवोपक्रमांची राज्यस्तरावर दखल; शर्मिला महेंद्र गावंड यांना ‘शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार’

## तीन वर्षांत 25 हून अधिक पुरस्कार; विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि डिजिटल माध्यमातून ज्ञानदानाचा अनोखा प्रवास

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नाविन्यपूर्ण, कृतीआधारित व विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शर्मिला महेंद्र गावंड यांना रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२६-२७ चा ‘शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची जिल्हास्तरावर झालेली ही दखल शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार, रायगडच्या पावन भूमीत सह्याद्रीच्या साक्षीने महाड येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारक पवित्र वास्तूमध्ये जिल्ह्यातील असंख्य मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला.पालकमंत्री भरत शेठ गोगावले , विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे , जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेशजी वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील , जिल्हा शिक्षण सभापती कळंबे , जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. नेहा भोसले मॅडम, जिल्हा परिषदेचे सर्व समित्यांचे सभापती , जिल्हा परिषद सदस्य, शिक्षणाधिकारी, सर्व तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीन शेवे, ता. उरण, जि. रायगड येथे कार्यरत असलेल्या गावंड यांनी पारंपरिक अध्यापन पद्धतीला नाविन्याची जोड देत विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता कृतीतून शिकावे, प्रयोगातून संकल्पना समजून घ्याव्यात आणि स्वतः विचार करून शिकण्याची सवय लागावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या या कार्याची दखल घेत गेल्या तीन वर्षांत त्यांना विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांकडून २५ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. स्थानिक पातळीपासून तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरापर्यंत त्यांच्या शैक्षणिक उपक्रमांची दखल घेतली गेली आहे.

**युट्युबच्या माध्यमातून ज्ञानाची व्यापक पोहोच :-** सध्याच्या डिजिटल युगाची गरज ओळखून गावंड यांनी युट्युबच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम, कृती, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त शैक्षणिक माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिली. त्यांच्या या डिजिटल उपक्रमांचा लाभ त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांसह अनेक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनाही होत आहे.

**DIET पनवेलच्या माध्यमातून राज्यस्तरापर्यंत मजल :-**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), पनवेल यांच्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी होत त्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. विविध उपक्रम, शैक्षणिक साहित्यनिर्मिती आणि कृतीआधारित अध्यापनाच्या माध्यमातून त्यांच्या कार्याला राज्यस्तरापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक साहित्यनिर्मिती, तंत्रज्ञानाचा वापर, कृतीआधारित अध्यापन, प्रयोगशीलता, अवांतर वाचन, सर्जनशीलता आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

“शिक्षकाचे खरे यश हे पुरस्कारांमध्ये नसून विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये असते,” या विचाराने प्रेरित होऊन त्या सातत्याने कार्यरत आहेत. मिळालेले पुरस्कार हे त्यांच्या कार्याचा शेवट नसून अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा असल्याचे त्यांचे मत आहे.

तीन वर्षांत २५ हून अधिक पुरस्कार, डिजिटल माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेले शैक्षणिक कार्य आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना मिळालेली राज्यस्तरीय दखल या सर्वांचा गौरव म्हणून ‘शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार’ त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील आणखी एक मानाचा टप्पा ठरला आहे. शर्मिला महेंद्र गावंड यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील सहकारी, विद्यार्थी, पालक, विविध शैक्षणिक संस्था आणि हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वेरूळमध्ये 17 सप्टेंबरला विश्वकर्मीय समाजाचा महामेळावा

## रोजगार, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शनासह शासकीय योजनांची माहिती; प्रदर्शनासाठी स्टॉलची संधी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने प्रभू विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र वेरूळ, ता. खुलताबाद येथे सुतार, लोहार, सोनार, तांबट, पाथरवट यांच्यासह विश्वकर्मीय समाज बांधवांचा महामेळावा आणि भव्य रोजगार, उद्योग व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विश्वकर्मीय समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ आणि कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी केले आहे.



मेळाव्याच्या आयोजनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून, संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष सचिन सुतार, राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर, राज्य उपाध्यक्ष राजेश नागपुरे व गोपाल राऊत, सरचिटणीस संजय सुतार, राज्य सचिव विलास पवार, धनराज वेलणकर, तानाजी शेटे, केशव सपकाळ, जिल्हा शहराध्यक्ष अमोल डोळस, शहर कार्याध्यक्ष किशोर सिरसाठ, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, परमेश्वर पांचाळ, बालाजी पांचाळ, प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, राज्य संघटक राजकुमार राऊत, प्रसिद्धीप्रमुख भगवान राऊत यांच्यासह राज्य, विभाग व जिल्हा पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. स्टॉल बुकिंगसाठी गोपाल राऊत (९७६४७२२७४२), आंबटसर (९८२३२३०४७८) आणि केशव सपकाळ (८३२९३०२३२८) यांच्याशी संपर्क साधावा.

वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिर, कन्नड रोड येथे दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणूक, उद्घाटन, रोजगार मेळावा, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, लघुउद्योजकांचे प्रदर्शन, स्टॉल व विक्री, पुरस्कार वितरण आणि समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

खादी व ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग (एमएसएमई), जिल्हा कौशल्य विकास विभाग तसेच आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित राहून विविध योजनांची माहिती देणार आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना, बांधकाम कामगार योजना तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) यांच्या माध्यमातून उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

या मेळाव्यात बेरोजगार तरुण, व्यावसायिक, लघुउद्योजक, व्यापारी आणि महिला बचत गटांच्या प्रतिनिधींनी सहभागी होऊन आपल्या उत्पादनांचे व व्यवसायाचे प्रदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नाममात्र दरात स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असून, यामुळे उद्योजकांना नवीन ग्राहक, बाजारपेठ आणि व्यवसायाच्या संधी मिळणार आहेत.

# लोककलावंतांनी कलाविष्काराने उपस्थित रसिकांची मने जिंकली

## लोककला महोत्सव रंगला, मानधन दुप्पट करण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** : गोंधळी गीत, देशभक्तीपर गीते आणि लोककला महोत्सवात रविवारी, १३ रोजी पारंपरिक लोककलांचे बहारदार सादरीकरणाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. महसूल प्रबोधिनी सभागृहात लोककलावंतांनी आपल्या अस्सल आणि दमदार आवाजात विविध कलाविष्कार सादर केले. याप्रसंगी सामाजिक न्याय तथा पालकमंत्री संजय शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कलावंतांनी वयोवृद्ध कलावंतांसाठीच्या मानधनात दुपटीने वाढ करण्याची आग्रही मागणी केली.

महाकवी वामनदादा कर्डक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै. पुंजाजीबाबा बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राज्यभरातील नामांकित लोककलावंत सहभागी झाले होते. प्रारंभी गोंधळी कलावंतांनी आपल्या पारंपरिक शैलीतून तसेच देशभक्तीपर गिते सादर केली.

पारंपरिक कलावंतांनीही आपल्या खास शैलीत विविध लोकगीते सादर करून कार्यक्रमात रंगत भरली. विशेष म्हणजे, कोणत्याही आधुनिक वाद्यसाधनांचा किंवा तांत्रिक उपकरणांचा आधार न घेता केवळ आपल्या सुरेल आवाजाच्या बळावर त्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अस्सल लोककलेची ताकद आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडले.

लोककलावंतांचे कौतुक

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी लोककलावंतांच्या कलेची मुक्तकंठाने प्रशंसा केली. लोककला आणि पारंपरिक कलावंतांच्या कलेचे जतन व संवर्धन होणे गरजेचे असल्याचे सांगत कलावंतांना शासकीय मदत तसेच मानधन मिळण्यासाठी लागणाऱ्या बाबींची पूर्तता करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. अध्यक्षस्थानी डॉ. ऋषिकेश कांबळे होते. ॲड. रमेशभाई खंडागळे, स. सो. खंडाळकर, पंडित बोर्डे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष एकनाथ त्रिभुवन आदींची प्रमुख उपस्थिती होती. मनोज त्रिभुवन यांनी मान्यवरांचे स्वागत व संचालन शांतीलाल पवार यांनी, तर आभार प्रवीण केदार यांनी मानले.

# शिवसेना प्रणीत श्रीगणेश महासंघ उत्सव समितीच्या अध्यक्षपदी श्रीरंग आमटे पाटील

## 14 ते 25 सप्टेंबरदरम्यान संभाजीपेठेतील शिवसेना भवनात विविध कार्यक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रणीत श्रीगणेश महासंघ उत्सव समितीची २०२६-२७ या वर्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्रीरंग आमटे पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त समितीच्या वतीने १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान संभाजीपेठ (औरंगपुरा) येथील शिवाई ट्रस्ट, शिवसेना भवन येथे विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांच्या नियोजनाची जबाबदारी नवनियुक्त कार्यकारिणीवर सोपविण्यात आली आहे.



समितीच्या उपाध्यक्षपदी प्रभाकर मते पाटील, किशोर कछवाह, संतोष जेजुरकर, संतोष खेंडके, राजू इंगळे, लक्ष्मीनारायण बाखरिया, हिरालाल सलामपुरे, विनायक देशमुख, बंटी जैस्वाल, हनुमान शिंदे, मनोज पेरे, गणेश लोखंडे, सचिन खैरे, वैशाली कोरडे, सुनीता सोनवणे व सावित्री वाणी यांची निवड झाली आहे. सरचिटणीसपदी बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, दिग्विजय शेरखाने, ज्ञानेश्वर डांगे, ऋषीकेश खैरे व धर्मराज दानवे, तर सचिवपदी गोपाळ कुलकर्णी, गिरीश चपळगावकर, वीरभद्र गादगे, प्रमोद ठेंगडे पाटील व विष्णू जाधव यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी अजय चोपडे, रामेश्वर कोरडे, स्वप्नील दिंडोरे व शिवाजीराव बोर्डे पाटील, तर स्वागताध्यक्षपदी चेतन कांबळे, अनिल चोरडिया, विजयराव साळवे, सुदाम सोनवणे व पद्माकर इंगळे यांची नियुक्ती झाली. मार्गदर्शक म्हणून चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, सुभाष पाटील, विनोद घोसाळकर, ज्योती ठाकरे, उदयसिंग राजपूत व डॉ. अण्णासाहेब शिंदे यांचा समावेश आहे. महिला समितीसह समन्वय व व्यवस्थापन समितीचीही निवड करण्यात आली असून, प्रसिद्धीप्रमुख म्हणून गणेश वाघ यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

# फुलंब्रीत आरोग्यसेवेचा आढावा; गणेशोत्सवात दररोज आरोग्य शिबिरांचे निर्देश

## NCD तपासणी व PMJAY कार्ड निर्मितीला गती; डॉ. अभय धानोरकर यांची आरोग्य संस्थांना भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : फुलंब्री तालुक्यातील नागरिकांना वेळेत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळावी, यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, फुलंब्री तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, बाबरा येथे भेट देऊन आरोग्यसेवेचा आढावा घेतला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी दररोज आरोग्य शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पाहणीदरम्यान राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी, मनुष्यबळ, औषधसाठा, साधनसामग्री, स्वच्छता, बाह्यरुग्ण सेवा तसेच रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवेची गुणवत्ता याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.



गणेशोत्सव काळात गणेश मंडळे तसेच गर्दीच्या ठिकाणी नियोजनबद्ध आरोग्य शिबिरे घेऊन नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी, रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी, आवश्यक औषधोपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या सूचना करण्यात आल्या. यासोबतच पात्र नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र बाबरा येथे NCD 100 Days Programme चा आढावा घेताना उच्च रक्तदाब, मधुमेह व इतर असंसर्गजन्य आजारांसाठी पात्र नागरिकांची गावनिहाय व क्षेत्रनिहाय तपासणी पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. आजारांचे वेळेत निदान करून उपचार व नियमित पाठपुरावा सुनिश्चित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांचे कार्ड तयार करण्यास गती देण्याचे निर्देश देण्यात आले. एकही पात्र नागरिक योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले.

यावेळी माता व बाल आरोग्य, प्रसूती सेवा, लसीकरण, RBSK, क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, NCD, औषध उपलब्धता, प्रयोगशाळा व संदर्भ सेवा आदींचाही आढावा घेण्यात आला. उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्रीचा प्रभावी वापर करून नागरिकांना सुलभ, तत्पर आणि लोकाभिमुख आरोग्यसेवा देण्याच्या सूचना डॉ. धानोरकर यांनी केल्या.

गणेशोत्सव काळात नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता लक्षात घेऊन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. दवाखान्यात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाशी सौजन्यपूर्ण व संवेदनशील वर्तन ठेवून आवश्यक सेवा तातडीने उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी श्री. चंदन गणोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल हनमंते, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण ऊगले, तालुका लेखापाल राहुल मिसाळ, स्वप्निल खिल्लारे तसेच संबंधित आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.







मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911